REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2018

# मराठी ग्रामीण साहित्य — एक आढावा




डॉ. हरिश्चंद्र मधुकर गायकवाड
मराठी विभाग प्रमुख
शिक्षणमहर्षी गुरूवर्य रा.गे.शिंदे महाविद्यालय,परांडा,
तालुका —परांडा जिल्हा.उस्मानाबाद.

## प्रस्तावना.

मराठी साहित्य हे जगातील सर्व भाषांमधील एक आभिजात साहित्य म्हणुन ओळखले जाते. मराठी साहित्यापासून अनेक प्रवाह परंपरा आपणास उदयास आलेल्या पहावयास मिळतात. जसे दलित साहित्य,ग्रामीण साहित्य, संत साहित्य इ.आज आपण या शोधनिबंधातून ग्रामीण साहित्य चळवळ या विषयीचा आढावा घेणारा आहोत ग्रामीण साहित्य हा देखील मराठी साहित्याचा एक अविभाज्य घटक मानला जातो. ग्रामीण साहित्यालाही एक इतिहास आहे. त्याचा आढावा या लेखात घेण्यात आलेला आहे.

ग्रामीण साहित्याचा प्रारंभ हा हरि नारायण आपटे यांच्या ‘काळ तर मोठा कठिण आला’ या कथेपासून झाला असल्याचे मानले जाते. कारण यामध्ये प्रत्यक्ष ग्रामीण जीवनाचे,समस्यांचे खरेखुरे वर्णन ,चित्रण करण्यात आले आहे. हे प्रथमच मराठी साहित्यविश्वात घडले आहे म्हणून ग्रामीण साहित्याचे सुरूवात झाली असे साहित्य विश्वात मानले जाते. या ग्रामीण साहित्याचा प्रवास कसा होत गेला ते पाहणे आवश्यक आहे.

## ग्रामीण साहित्याचा अर्थ

ग्रामीण या संज्ञेचा अर्थ स.शि.भावे यांनी सांगितला आहे ते म्हणतात स्थलकालनिष्ठ जिवंत वातावरण हा ग्रामीणतेचा अशहरी आशय ते मानतात. दत्ता भोसले यांच्या मते ‘आजच्या ग्रामीण साहित्यात भूक,दारिद्रय,अज्ञान,शोषण,आणि उपेक्षा या गोष्टीतून उदध्वस्त झालेल्या जीवनाचे चित्रण येते’म्हणजे त्यालाच ग्रामीण साहित्य म्हणावे लागेल. ग्रामीण साहित्यात येणारा निसर्ग शेतीनिष्ठ जीवन, जीवनशैली, शोषण निसर्गाशी संघर्ष,जातीव्यवस्था,अर्थव्यवस्था,नागरी जीवन व ग्रामीण जीवन यांच्या जाणिवेतील फरक,संस्कृती,बोलीभाषा अशा घटकांना समाविष्ट करून ग्रामीण साहित्य हे समृद्ध बनले आहे. हे ग्रामीण साहित्य समृद्ध बनविणारे लेखन व त्याच्या साहित्यकृती याविषयी माहिती घेवू.

## ग्रामीण साहित्यिक व साहित्यकृती

१९२० पासून ग्रामीण साहित्याची निर्मिती होत असली तरी तीं लक्षणीय स्वरूपाची नव्हती. ग्रामीण साहित्य निर्मिती मध्ये हरिभाउंच्या कथेपासून किंवा सुखटणकर,रामतनय,धनुर्धारी,सरदेसाई वरेकर इत्यादी लेखकांनी ग्रामीण साहित्य निर्मिती केलेली पहावयास मिळते.

दलित साहित्याची चळवळ १९६५ नंतर ख—या अर्थाने सुरू झाली असे आपण मानतो. त्यापूर्वीही दलित साहित्य लेखन होत होते पण तिला चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले नव्हते. अशाच प्रकारे १९७५ पूर्वी देखील ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे अनेक लेखक व त्यांच्या साहित्यकृती होत्या पण त्या ग्रामीण साहित्याला चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले नव्हते. १९७५ नंतर ख—या अर्थाने ग्रामीण साहित्य चळवळ उभी राहीली.

आनंद यादव, वासुदेव मुलाटे, भास्कर चंदनशिव, रा.र.बराडे, कुलकर्णी, अरविंद वामन कुलकर्णी, र.बा.मंचरकर, चंद्रकुमार नलगे, रविंद्र ठाकुर, महाविर जोधळे, भीमराव गुंडेकर, इंगोले, उत्तम बावस्कर ,द. ता.भोसले, अविनाश डोळस इत्यादींनी ग्रामीण साहित्याच्या चळवळीच्या निर्मिती काळातील कारणांची वास्तवाची ध्येयांची सविस्तर चर्चा केलेली आहे. यातील काही लेखक ग्रामीण साहित्यांचे लेखनही करत होते.

शरद पाटील यांनी त्यांच्या 'दासशुद्रांची गुलामगिरी','अब्राहमणी' साहित्याचे सौदर्यशास्त्र 'मार्क्सवाद—फुले—आंबेडकरवाद' इत्यादी ग्रथामधून ग्रामीण साहित्याच्या चळवळीला बहुजनसाहित्य चळवळ असे व्यापक स्वरूप दिले.

## ग्रामीण साहित्यांची वैशिष्टे

१ ग्रामीण साहित्यातून ग्रामीण भागातील जीवनशैली ग्रामीण साहित्यीकांनी वर्णन केली. ग्रामीण भागातील लोकांचे जीवन,त्याची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी याविषयी मांडणी लेखकांनी कथा,कादंबरी,कविता इत्यादींच्या माध्यमातून केली.
२. ग्रामीण साहित्यातून शेतक—यांच्या प्रश्नांवर त्यांच्या संघर्ष व समस्यांवर भाष्य करण्यात आले. शहरी भागातील समस्या व ग्रामीण भागातील समस्या यामधील तफावत ग्रामीण साहित्यामधून मांडण्यात आली.
३.ग्रामीण साहित्यातून ग्रामीण जीवनाचे तिथल्या समस्यांचे,लोकजीवनाचे खरेखुरे चित्रण करण्यात आले. तिथे होणारे शोषण,अन्याय,संघर्ष इत्यादी बाबींचा उल्लेख ग्रामीण साहित्यातून आपणास पहावयास मिळतो.
४. ग्रामीण साहित्य चळवळीने ग्रामीण समाज हा सोशक असतो ही भुमिका बदलून त्या समाजात स्वाभिमान निर्माण करण्याचा प्रयत्न केला.
५. ग्रामीण लेखकाला निश्चित भूमिका तयार करण्याचे वैचारिक सामर्थ्य या ग्रामीण साहित्य चळवळीने दिले.
६. मराठी समाज मराठी साहित्यामधून येत होता. परंतु त्यामध्ये खेडयातील ग्रामीण माणुस,त्याचे जीवन,त्याच्या समस्या,दु:ख व त्याच्या संस्कृतीचे आणि जीवनपद्धतीचे चित्रण साहित्यामधून येत नव्हते हे सर्व ग्रामीण साहित्यातून लोकांसमोर आले.

## संदर्भग्रंथसूची

१.यादव आनंद— ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या मेहता पब्लिशिंग हाउ—स पुणे १९७९
२. कोतापल्ले नागनाथ : साहित्याचा अवकाश प्रतिमा प.पुणे २००३